-: प्रेस नोट :- दिनांक:- ०४/०९/२०२३

# अग्निशस्त्राव्दारे गोळीबार करून खूनाचा प्रयत्न करणे या गुन्हयातील पाहिजे आरोपीतांस कक्ष - ५ गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतलेबाबत .

| | | |
|---|---|---|
| १ | कक्ष | गु.प्र.शा., गु.अ.वि., कुर्ला (प.), मुंबई ७०. |
| २ | गु.नो.क्र. व कलम | व्ही.बी. नगर पोलीस ठाणे गु.र.क्र. १९१/२०२३, कलम ३०७,३४१,५०६(२),५०४,३४ भा.द.वि. सह कलम ३,५,२५,२७ भारतीय हत्यार कायदा सह कलम ७ क्रिमीनल लॉ अॅमेडमेन्ट अॅक्ट १९३२ |
| ३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ | दि. ३०/०८/२०२३ रोजी ११.१५ ते ११.३० वा च्या दरम्यान |
| ४ | गुन्हा दाखल दिनांक | दि. ३०/०८/२०२३ रोजी २१.१० वाजता. |
| ५ | आरोपीचे नाव | पुरुष, वय ३५ वर्षे, रा.ठी. जयशंकर चौक, माकडवाला कम्पाउंड, ब्लॉक न. २, खोली क्र. १६५, हलावपुल, कुर्ला (प.), मुंबई |
| ६ | गुन्हयाचा हेतू | जिवे ठार मारण्यासाठी शस्त्र पुरविणे |
| ७ | थोडक्यात प्रेस नोट | खालील प्रमाणे |

दिनांक ३०/०८/२०२३ रोजी ११.१५ ते ११.३० वा च्या दरम्यान रूम नं. ३५७, पवार चाळ, जय शंकर चौक, हलाव पुल, कुर्ला पश्चिम, मुंबई येथे अभिलेखावरील आरोपी नामे आशीष पवार याने त्याचे परिसरात रहावयास असणारे फिर्यादी यांचेवर पुर्व वैमनस्यातून देशी बनावटीचे कट्टयातून गोळीबार करून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणून फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीवरुन वरनमुद प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून कक्ष ५ मार्फतीने सदर गुन्हयाचा समांतर तपास करत असताना अटक आरोपी नामे आशीष पवार यास पाहीजे आरोपीताने गुन्हयात वापरलेले अग्निशस्त्र व जिवंत काडतुसे पुरविले असल्याची माहिती मिळून आल्याने कक्ष ५ मार्फतीने सदर आरोपीताचा तांत्रिकरित्या शोध घेत असताना सदर आरोपी हा कुर्ला परिसरात मिळून आल्याने त्यास सापळा रचून ताब्यात घेवून पुढील तपासकामी व्ही.बी. नगर पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले आहे.

अशाप्रकारे अभिलेखावरील आरोपीतास अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे पुरविणारा आरोपीताचा कोणत्याही प्रकारे सुगावा लागत नसताना तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे कक्ष ५ यांनी अथक परिश्रम घेवून नमूद आरोपीतास ताब्यात घेतले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई, श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशीकुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. राज तिलक रौशन, मा. पोलीस उप आयुक्त (प्रतिबंधक) श्री. अमोघ गांवकर (अति. कार्यभार), मा. सहा. पो. आयुक्त (मध्य), श्री. दत्तात्रय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ५ चे प्र.पो.नि. घनश्याम नायर, म.पो.नि. सुनिता भोर, पो.नि. अजित गोंधळी, स.पो.नि. अमोल माळी, स.पो.नि. जयदीप जाधव, पो.उ.नि. विजय बेंडाले, स. पो.उ.नि. अंकुश न्यायनिर्गुणे, अशोक भुजबळ, रविंद्र राणे, पो.ह. धनंजय पैंगणकर, विलास देसाई, सुजित घाडगे, इक्बाल सिंग, मिलींद निरभवने, नितेश विचारे, संजय वायंगणकर, अविनाश चिलप, तानाजी पाटील, सुनिल जाधव, पो.शि. गणेश काळे, सरफरोज मुलाणी, पो.शि. प्रमोद पाटील, भाउसो पवार तसेच म.पो.ह.क्र. सुनिता शिंदे, म.पो.शि. शुभांगी पाटील व पो.ह.चालक काबंळे, पो.शि. रवी वाघमारे यांनी केली आहे.